दि. ०९/११/१८

आदर्श प्रतिष्ठान,शहादा

व्दारा कुलकर्णी रूग्णालय, शहादा

# बातमी

## आदर्श प्रतिष्ठान,शहादा यांचा ‘निरागस’ प्रकल्प व अन्नदाता योजना

आदर्श प्रतिष्ठान एक सेवा भावी संस्था आहे. सध्या आदर्श प्रतिष्ठानतर्फे ‘निरागस’ हा प्रकल्प राबवला जात आहे. ह्या प्रकल्पात प्रामुख्याने नंदुरबार जिल्हयातील गरीबी रेषेखालील कुपोषित बालकांवर उपचार करण्यात येतो. अश्या बालकांना कुलकर्णी रूग्णालय शहादा येथे आणून त्यांची तपासणी, औषधोपचार व आहार मोफत देण्याचे काम सुरु आहे.

**चिरंजीव मुर्तुजा बद्री** व **चिरंजीव बुरहानुद्दीन बद्री** ह्या मुलांनी या दिवाळीत फटाक्यांवर खर्च न करता ती रक्कम आदर्श प्रतिष्ठान शहादा ह्या स्वयंसेवी संस्थेला देणगी दिली. ह्या पैंशातुन १० मुलांना महिनाभर ‘पुरक आहार’ देता येईल. त्यांना शतशः धन्यवाद. आपणही आमच्या ‘अन्नदाता’ मोहिमेत सहभागी होवून असे अन्नदान करावे ही विनंती.

**अन्नदाता योजनेत आपण खालील प्रमाणे सहभागी होऊ शकतात.**

१) १ मुलाचा दवाखान्यातला ७ दिवस पोषणयूक्त जेवणाचा खर्च — ५००/-
(रोज ८ वेळा अन्न दिले जाते)

२) १ मुलाला महिनाभर पुरेल इतका ‘पूरक आहार’ (गेहुना) चा खर्च — १५०/-

आपण एक किंवा अनेक मुलांसाठी देणगी देऊ शकता व ‘अन्नदाता होऊ शकता.

## “अन्नदाता सुखी भवः”

आदर्श प्रतिष्ठान, शहादा

अध्यक्ष